# जिजाऊ मल्टीस्टेट एमपीआयडी प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी

## लाचखोर पीआय हरिभाऊ खाडेला बडतर्फ करा : मारुती तिपाले, शेख कुतुब

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणताना आर्थिक गुन्हेगारी क्षेत्राकडे सुध्दा गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना लुबाडणाऱ्या व्हाईट कॉलर अर्थिक गुंडाना कडक शिक्षा देवून धडा शिकवला पाहिजे. ठेवीदारांना न्याय देण्या ऐवजी कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या आरोपींना मदत करणारे आर्थिक गुन्हे शाखेचे तपास अधिकारी लाचखोर पीआय हरिभाऊ खाडे यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने मारुती तिपाले व शेख कुतुब यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात जिजाऊ माँसाहेब , ज्ञानराधा, साईराम ,राजस्थानी, मराठवाडा अर्बन यांच्यासह अनेक मल्टीस्टेट बँकांनी सामान्य जनतेचे करोडो रुपये लुटले. अन्यागग्रस्त ठेवीदार हतबल असुन त्यांचे संसार आर्थिक संकटात आले. जिल्ह्यतील आर्थिक गुन्हेगारी बाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी उदासीनता दाखवली.आंदोलन, पाठपूरावा करून ही शासनाने दुर्लक्ष केले. परिस्थितीचा फायदा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांनी चांगलेच हात धुवून घेतले.

कर्तव्याचे भान न ठेवता ठेवीदारांना वाऱ्यावर सोडून आरोपींना मदत व फायदा होईल असाच तपास केला गेला. अनेक आरोपी फरार आहेत, तर ज्यांना पकडले त्यांची थातूरमातूर चौकशी करून कागदं काळे केले. आरोपींचा बीपी वाढेल अशी सबब पुढे करून जाणीवपूर्वक आरोपी कडून ठोस माहिती काढली नाही.

पोलीस आणि आरोपी यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार घडल्याने तपास कुचकामी ठरला. ठेवीदारांनी गुन्हा नोंद करून पावणे दोन वर्ष होत आहेत. अजूनही तपास पूर्णत्वाकडे नाही, एमपीआयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे आहे. ठेवीदारांना त्यांच्या घामाचा पैसा परत मिळणार की नाही याबद्दल साशंकता आहे. शासन दरबारी न्याय मिळवण्या साठी ठेवीदार धडपडत आहेत. न्याय विलंबना साठी पोलीस प्रशासन जबाबदार आहे.

जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव घोटाळा प्रकणाचे तपास अधिकारी पीआय हरिभाऊ खाडे यांनी तपास काम करताना लाच घेतली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागात त्यांचे विरोधात गुन्हा नोंक्र. ०१०७/१६/५/२०२४ रोजी गुन्हा रोजी नोंद केला गेला. खाडेवर पोलीस कस्टडी व न्यायालयीन कोठडीची कारवाई करण्यात आली. परंतु मुदतपूर्व चार्जशीट न्यायालयात दाखल करण्याची परवानगी वरिष्ठांनी नाकारली. यामुळे त्यांना जामीन मिळाला. रंगे हात पाच लाख रुपयांची लाच स्वीकारताना सक्षम अधिकारी पकडला.

### देवेंद्रभाऊ सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लाचखोर पीआय खाडे यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करावे

**जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट एमपीआयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी ११ जुलै २०२४ पासून गृह विभागाकडे आहे. हा प्रस्ताव अपूर्ण असून यामध्ये सर्व आरोपींच्या मालमत्ता समाविष्ट करून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. व ठेवीदारांना पैसे परत देण्यासाठी ठोस कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी जिजाऊ माँसाहेब ठेवीदार डॉ. अरविंद काकडे,इंजि. सखाराम कळासे, लक्ष्मण हाटवटे, चंद्रकला ताई बांगर, विशाखा सूर्यवंशी, भाऊसाहेब परसे, सूर्यभान नवले, आदींनी केली आहे.**

## थोडक्यात

### सरपंच अँड. नासेर पठाण यांची त्रिपुरा अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाल्यामुळे भव्य सत्कार



**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन व यशदा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित त्रिपुरा येथील अभ्यास दौऱ्यासाठी माजलगाव तालुक्यातील लुखेगावचे सरपंच अँड. नासेर खान दौलतखान पठाण यांची निवड करण्यात आली आहे.राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान २०२४-२५ अंतर्गत छत्रपती संभाजी नगर विभागातील अधिकारी व पदाधिकारी यांचा यशदा व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दिनांक २३ डिसेंबर ते २७ डिसेंबर या कालावधीत त्रिपुरा राज्यात विवीध ठिकाणी सात दिवसाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यात विभागातील अधिकारी व महाराष्ट्रातील ४० सरपंच या अभ्यास दौऱ्यासाठी सहभागी होणार आहेत. यात माजलगाव तालुक्यातील लुखेगाव येथील सात वेळा सलग सरपंच पदी निवडुन आलेले अँड. नासेर खान दौलत खान पठाण यांची निवड करण्यात आली आहे. ते आगरताळा येथे दिनांक २२ रोजी रवाना होणार आहेत. त्यांची या दौऱ्यासाठी निवड झाल्याने त्यांचे लुखेगाव येथिल माजी,सरपंच खुदायतखान,खलील पठाण गुत्तेदार, सुलतान खान ,अजिस खान ,एजास पटेल , डॉ तोफिक पठाण, ग्रा.प.सदस्य वाजेद पठाण, ग्रा.प.सदस्य शाहेद पठाण, युवा नेते,अदिल पठाण, सह आदींनी शाल फेटा बांधून अभिनंदन व सत्कार करण्यात आला आहे.

### श्री चंद्रशेखर शिवाचार्य महाराज माजलगावकर यांच्या शुभ हस्ते श्री मंगलनाथ मल्टिस्टेट ची दिनदर्शिका प्रकाशित



**माजलगाव । प्रतिनिधी**

दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे दिनदर्शिका प्रकाशन सोहळा संपन्न झाला. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करून माजलगाव मिस्कीन स्वामी मठ संस्थान चे मठाधीपती श्री.ष.ब.१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते दिनदर्शिका २०२५ चे लोक प्रकाशन करण्यात आले... याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री आर.जी कानडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, संस्थेला २५ वर्ष पूर्ण झाली आहेत सभासदांना संस्थेच्या विविध योजनांची माहिती व्हावी व दिनदर्शिकेचा देखील लाभ सभासदांना घेता यावा करीता संस्था गेली २५ वर्षांपासून अखंडित परंपरागत दिनदर्शिकेचे प्रकाशन करत आहे. त्याच बरोबर सर्व सभासदांना सदरील दिनदर्शिका घरपोच दिली जाणार आहे. संस्थेचे श्रद्धास्थान लिंगैक्य प्रभू पंडिताराध्याय शिवाचार्य महाराज यांनी वचन,निष्ठा व समाजसेवा या घालून दिलेल्या तीन बंधननावरती संस्था कार्य करत असल्यामुळे संस्थेला आज यशस्वी २५ वर्ष पूर्ण झाली.

### आष्टी येथील बी व एम फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आविष्कार २०२४ मध्ये मिळवला द्वितीय क्रमांक



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित कॉलेज ऑफ फार्मासुटिकल सायन्स अँड रिसर्च ,आष्टी (डी फार्मसी, बी फार्मसी, एम फार्मसी कॉलेज) या कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी आयोजित झालेल्या विद्यापीठ आविष्कार २०२४ मध्ये द्वितीय क्रमांक मिळवला आहे. आविष्कार हा एक संशोधन महोत्सव आणि स्पर्धा आहे जी विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पना, नवकल्पना आणि कौशल्ये सादर करण्यासाठी प्रोत्साहित करते, नवीन औषधी क्षेत्रामधील संशोधनचा अभ्यास केला जातो व नवीन प्रकारचे जे काही संशोधन आहे त्याला पारितोषिक दिले जाते, हा आविष्कार कार्यक्रम स्पर्धेच्या स्वरूपात सुरुवातीला विद्यापीठ अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांचा मिळून जिल्हा पातळीवर प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी घेतला जातो, तो १० ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्ह्याच्या ठिकाणी घेण्यात आला, यामध्ये आष्टीच्या फार्मसी कॉलेज मधील बी. फार्मसी शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला होता त्यामध्ये प्रथम क्रमांक कुमारी. लगड राजनंदिनी, कुदळे श्रद्धा व द्वितीय क्रमांक कुमारी भोज साक्षी व झगडे स्नेहल ने मिळवला होता.

# बाळराजेच्या वाढदिवसानिमित्त शिवराज पवारांच्या हास्ते उर्दुशाळेत शालेय साहित्यांचे वाटप

## वंजारा क्रांती दल, शौहेब आत्तारांच्या वतिने उसतोड कामगारांना ब्लॅन्केटचे शिवराज पवारांच्या हास्ते वाटप

**गेवराई । प्रतिनिधी**

स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय लोकनेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई मतदारसंघात सर्वत्र विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात आला दि.२१ डिसेंबर रोजी बाळराजे पवार यांच्या वाढदिवसा निमित्त शेख निजामभाई यांच्या वतिने आयोजन केलेल्या कार्यक्रमात शिवराज पवार यांच्या हास्ते संजयनगर येथील बिलाल उर्दु शाळेत शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले




तसेच गेवराई शिवारातील उसतोड कामगारांना थंडी पासुन सौरक्षण मिळावे हणून बंजारा क्रांती दलाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण चव्हाण यांच्या वतिने उबदार ब्लॅन्केट वाटप शिवराज पवार यांच्या हास्ते उसांच्या फडावर जाऊन करण्यात आले तर उपजिल्हा रुग्णालयात शौहेब आत्तार व मोमीन बाबु फिटर यांच्या वतिने ५१ ब्लॅन्केट तसेच रुग्णांना फळ वाटप करण्यात आले यावेळी मा. उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी, सय्यद आय्युबभाई, काझी सर, शिवाजी मामडे, शिवाजी बाजोड, लव्हाळे, राम पवार,लक्ष्मण चव्हाण, योगेश पठाण, पिटु साळवे, शेख मुददशीर, शौकत पठाण, रणजीत काबळे, शेख बाबा, महेश सौंदरमल, समाधान मस्के, शेख ईर्शाद, दाऊद पठाण, शेख उस्मान, आनंद सुतार, महादेव बेद्रे, ईमरान भाई, सय्यद माजेद, करण जाधव, कृष्णा पाटोळे, सोहेल पठाण, शेख ईरफान, अमन सुतार, अमोल मस्के, सलमान आत्तार, शेख जहीर, आदि उपस्थित होते.

### नवीन पोलीस अधीक्षक यांचे बीड जिल्ह्यात स्वागत

## परळी शहर आणि तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी कठोर पावले उचलावीत : राजेभाऊ फड

**परळी । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्याचे तत्कालीन पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तडकाफडकी बदली करून नवीन पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कांवत हे रुजू होत आहेत. बीड जिल्ह्यात बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था लक्षात घेता हा निर्णय घेत असल्याची घोषणा मुख्यंत्र्यांनी विधिमंडळात केली. आता नवीन पोलीस अधिक्षकांकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. बीड जिल्ह्यातील आणि परळी शहर व तालुक्यातील अवैध धंद्यांना पायबंद घालावा ज्यामुळे गुन्हेगारी कमी होईल अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी व्यक्त केली आहे. बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांत अनेक विचित्र घटना घडल्याने जिल्ह्याचे नाव देशभरात बदनाम झाले आहे. गुन्हेगारांना कायद्याचा अजिबात धाक राहिलेला नाही. खून, दरोडे, चोऱ्यामाऱ्या, अवैध दारू विक्री, अवैध गुटखा, वाळू माफिया, तसेच अनेक प्रकारचे अवैध धंदे चालत आहेत. यावर नावे पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी विशेष लक्ष घालून क्लीनअप मोहीम हाती घ्यावी तसेच परळी आणि तालुका परिसरात चालू असलेल्या अनेक अवैध धंद्यांना पायबंद करावा. यामुळे येथील कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत होईल. तर बदनाम होत असलेले जिल्ह्याचे नाव आणि प्रतिमा सुधारणेसाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलावीत अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.

# मुलांच्या शिक्षणाकरिता अर्धपोटी उपाशी रहा पण शिकवा सांगणारे संत गाडगेबाबा चालते बोलते विद्यापीठ होय: प्राचार्य सुशील कुमार गायकवाड

**बीड । प्रतिनिधी**

पुस्तके बोलत नाहीत पण त्यांना वाचणारे बोलू लागतात तरी मुलांच्या शिक्षणाकरिता अर्धपोटी उपाशी रहा पण मुला - मुलींना शिकवा सांगणारे संत गाडगेबाबा चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांनी आपल्या कीर्तनातून सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत अंधश्रद्धा मुक्ती, मानव सेवा म्हणजेच ईश सेवा, अनिष्ट रूढी परंपराचा त्याग व माणसातच देव आहे असे समजून माणसाची सेवा याबद्दल केलेल्या अमोल उपदेशाप्रमाणे आपल्या जीवनाची वाटचाल ठेवणे हेच संत गाडगेबाबांच्या स्मृतिदिनी खरी भावपूर्ण आदरांजली ठरेल असे प्रतिपादन महामानवा अभिवादन ग्रुपने आयोजित केलेल्या प्रकाश आंबेडकर नगर येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी लाभलेले प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड यांनी केले. याप्रसंगी से.नि. जिल्हा प्रबंधक (एलआयसी) यू.एस. वाघमारे व प्रशांत वासनिक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले, वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे समता सैनिक दलाचे मेजर कॅप्टन राजाभाऊ आठवले, डॉक्टर जगदीश वाघमारे, एड. तेजस वडमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बबीता गायकवाड यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.अशोक गायकवाड यांनी करून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते वाचनालय राबवीत असलेल्या उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे मान्यवरांच्या हस्ते उपस्थित ८० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही - पेन) वाटप केले.

# गेवराई शहरातील महा आरोग्य शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद

## हृदयविकाराकडे दूर्लक्ष करू नका, काळजी घ्या : डॉ. सुनिल बोबडे : स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ द्या : माजी आमदार लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**

रोजच्या धावपळीत आयुष्याकडे दूर्लक्ष झाल आहे. त्यामुळे, आजाराचा आलेख उंचावत चालला आहे. काळजी करण्याची गरज असून, नागरीकांनी निरोगी आरोग्यासाठी स्वतःची काळजी घेतलीच पाहिजे. ह्रदय विकाराच्या वाढत्या घटना काळजीत टाकणाऱ्या असून, वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ह्रदय रोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे यांनी येथे बोलताना केले आहे. शनिवार ता. २१ डिसेंबर रोजी युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजीमहाराज शॉपिंग सेंटर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.




व्यासपीठावर माजी आमदार लक्ष्मण पवार, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, डॉक्टर राजेश शिंदे, डॉक्टर सराफ, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, डॉ.धनजय माने, डॉ.दिपक फाटक,डॉ. आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती. दरम्यान, दैनंदिन जीवनात भाजीपाला आणि हलक्या आहाराचा उपयोग करून, तळलेले, तेलकट आणि मेदयुक्त पदार्थ टाळायचा प्रयत्न करा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले आहे. आपल्याकडे सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घ्या, असे आवाहन करून, बीड शहरात आपल्या हक्काचा मेडिकेअर नावाचा दवाखाना रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. गेल्या दीड - दोन वर्षांपासून बांधिलकी जोपासून आम्ही करत आहोत. शासन स्तरावर असलेली सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, गेवराईकरांनी हक्काने यावे, असे कृतज्ञतापूर्वक आवाहन डॉक्टर बोबडे यांनी शेवटी बोलताना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक संजय इंगळे यांनी केले. आभार ड. भगवान घुंबार्डे यांनी मानले.बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतीने पार पडलेल्या महा शिबीरात मधुमेह , रक्तदाब, हृदयरोग, ई.सि.जी. करण्यात आली. या शिबीरात नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवून शिबीराचा लाभ घेतला. सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी

राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे, दादासाहेब गिरी, ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्म पाल सौदरमल, भरत गायकवाड, सय्यद बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के, जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे, जुनेद बागवान, इम्रान पठाण,सय्यद हासन, यांनी प्रयत्न केले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले देशमुख परिवाराचे सांत्वन

## दोषी व्यक्तींना कठोर शासन होईल याची दिली ग्वाही





सरपंच स्व.संतोषअण्णा देशमुख यांच्या कुटुंबियांची राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी सांत्वनपर भेट घेतली. याप्रसंगी पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांची उपस्थिती होती.

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या खुन्यांना कठोर शिक्षा होईल या दृष्टिकोनातून शासन काम करीत आहे याप्रकरणी दोषी व्यक्तींना फाशी दिली जाईल यासाठी मी स्वतः या प्रकरणात पूर्ण लक्ष देणार आहे अशी ग्वाही देतो असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मस्साजोग येथे देशमुख यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन प्रसंगी सांगितले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मस्साजोग येथे भेट दिली. दिवंगत देशमुख यांची पत्नी, मुलगी तसेच भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी त्यांनी घटनेबाबत चर्चा करून माहिती घेतली व शासन सर्व प्रकारे या प्रकरणात तपास करून देशमुख कुटुंबाला न्याय मिळवून देईल असे सांगितले. सदर घटना ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे असेही ते म्हणाले. शासनाच्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो असे श्री. पवार म्हणाले. त्यांनी दिवंगत देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली. पोलीस आपल्या पद्धतीने तपास करीत आहेत सोबतच न्यायालयीन चौकशी सुरू असून यात कुठलीही त्रुटी राहणार नाही असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, या घटनेमागे कोणी मास्टरमाईंड असेल तर त्यालाही सोडले जाणार नाही. यावेळी श्री पवार यांच्या समवेत ज्येष्ठ नेते रमेश आडसकर,डॉ. योगेश क्षीरसागर तसेच आदि उपस्थित होते.

### महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख चा पंजाब केसरी भोला ठाकूर सोबत रविवारी होणार कुस्तीचा सामना

## देवदहिफळ येथे ‘पटेल युवा केसरी’ पुरस्काराचा मानकरी कोण ठरणार?

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे पटेल युवा प्रतिष्ठानच्या वतीने भव्य कुस्तीच्या दंगलीचे आयोजन रविवारी करण्यात आले आहे. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध पंजाब केसरी भोला ठाकूर याचा सामना या दंगलीत होणार असून या सोहळ्यात उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

बीड जिल्ह्यात प्रथमच राष्ट्रीय पातळीवरील पहिलवानांच्या कुस्त्या देवदहिफळ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

या दंगलीत महाराष्ट्रातील नामवंत पैलवान संदीप तिडके चा सामना सुमित बारस्कर सोबत, पृथ्वीराज वनवे चा राजू कदम,कृष्णा पवार चा अबू चाऊस, मोनू सिंग चा उमर शेख विरोधात होणारा सामना रोमहर्षक असणार आहे.

बीड जिल्ह्यातील देवदहिफळ हे बालाघाट डोंगराच्या भागातील ठिकाण आहे. या भागात हजारो पैलवान घडत आहेत. महाराष्ट्र केसरी शिवाजी केकान यांच्यासारखी मार्गदर्शक पैलवान मंडळी कुस्त्यांच्या फडांना प्रोत्साहन देण्याचे काम करते. यातच बीड जिल्ह्यातील पटेल युवा प्रतिष्ठानच्या वतीने राज्य पातळीवरील कुस्तीच्या फडातील नामांकित पैलवान देवदहिफळ येथे कुस्ती सामन्यासाठी आमंत्रित केले आहेत. महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख व पंजाब केसरी भोला ठाकूर यांच्या नियोजित कुस्ती संपन्न होणार असून पटेल युवा केसरीचा मानकरी कोण होणार ? हा सामना पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक मतीन शेख सह देव दहिफळ ग्रामस्थांनी केले आहे.

# च-हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू

## जनतेचे 2 कोटी 70 लाख रुपयांचा चुराडा; जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करा : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**



अहिल्यानगर -बीड- परळी या रेल्वेचे स्वप्न बीडकरांनी गेल्या अनेक वर्षांपासून जागवले आहे. अनेक घडामोडी मागच्या काळात झाल्या. मात्र रेल्वे कधी येणार याबाबत काहीच सांगता येत नव्हते मात्र गेल्या ५ वर्षांमध्ये रेल्वेच्या कामाला प्रचंड गती मिळाली असुन बीड जिल्हावासियांचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण २०२५ अखेरीस पुर्ण होण्याची चिन्हे दिसत आहेत. अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाची अंमळनेर ते विघनवाडी अशी ३३.१२ किलोमीटरची चाचणी ९ आगस्ट २०२४ रोजी पुर्ण झाल्यानंतर आता शिरूर तालुक्यातील विघनवाडी ते बीड अशा ३५ किलोमीटर अंतरापैकी २२ किमीचे नवगण राजुरी गावापर्यंत रेल्वेचे रूळ अंथरण्याचे काम पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२४ अखेर रेल्वेची चाचणी होणार आहे.पुढच्या टप्प्यातील नवगण राजुरी ते बीड अशा १३ किलोमीटर अंतरात रेल्वे रूळ अंथरण्याचे काम सध्या प्रगती पथावर असुन जानेवारी २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात या मार्गावरील सुरक्षेची चाचणी घेण्यात येणार आहे. मात्र बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाट्यावरील ८-९ वर्षांपूर्वी तब्बल २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या रेल्वे पुलाचे सध्या क्रासमॅच होत असुन सरळ रेषेत नसल्याने हा रेल्वेपुल पाडण्याचे सध्या काम सुरू असुन जनतेच्या करातुन तब्बल २ कोटी ७० लाठ रूपये बांधण्यात आलेल्या रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू असुन संबंधित प्रकरणात जबाबदार अभियंता व ईतर आधिका-यांवर कारवाई करण्यात येऊन त्यांच्या कडुन नुकसान भरपाई घेण्यात यावी अशी मागणी केली आहे.

# पूलाचे काम पूर्ण करण्यासाठी इंजि. चाटे यांनी कमिशन मागितल्याचे निवेदन

## साहेब म्हणतात , मी धनंजय मुंडेचा पाहुणा तुला काय करायचे ते कर

**वडवणी । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील मौजे बेलवाडी शिवारातील रामा ५५ ते बेलवाडी रस्ता साक्र ०/०० ते रामा २/५०० या ग्रा मा १८२ रस्त्यावरील पूल बांधण्याचा कार्यारंभ आदेश देऊन देखील इंजिनीयर साठे यांनी नळकांडी पुलाचे बांधकाम अर्धवट टाकून रस्ता केला नाही. तसेच अर्धवट पूल देखील खोदून नळ्या काढून टाकल्या यामुळे आपल्या शेतीचे नुकसान झाले असल्याची तक्रार बाभूळवाडी येथील रहिवासी श्रीकृष्ण नवनाथ सातपुते यांनी केली आहे. तर पूल कामासाठी ५० हजार रुपये कमिशनची देखील मागणी केले असल्याचा आरोप सातपुते यांनी केला आहे. यासंदर्भात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, मौजे बेलवाडी तालुका जिल्हा बीड येथील राज्य मार्ग ५५ ते बेलवाडी रस्ता साक्र ०/०० ते २/५०० बीड ड्रामा १८२ या रस्त्याची वर्क ऑर्डर कंत्राटदार वसीम हमीद शेख यांना जिल्हा परिषद बीड बांधकाम क्रमांक १ कार्यकारी अभियंता यांच्याकडून १८ जुलै २०२२ ला मिळाली. तसे रस्त्याचे काही काम झाले असून या रस्त्यावर एक नळकांडी पूल असताना तो पूल इंजिनियर चाटे यांनी अर्धवट काम करून ठेवला. तो तसाच सोडून दिला त्यांना सदर पुलाचे काम पूर्ण करून घ्या, असे म्हटल्यावर त्यांनी ५० हजार रू कमीशन दे तेव्हा सदर पुलाचे काम पूर्ण करून देईल अन्यथा नाही. असे नमूद करण्याबरोबरच, मी धनंजय मुंडे यांचा पाहुणा आहे. तू जर पैसे दिले नाहीत तर काम पूर्ण होणार नाही. तुला काय करायचे ते कर, अशी धमकी दिली. व जे पुलाचे अर्धवट काम झाले होते त्यातील नळ्या देखील खोदून इंजिनीयर चाटे यांनी काढून टाकल्या.

### बाळराजे पवारांच्या वाढदिवसानिमित्त

## सौ. गिताभाभीच्या हस्ते शालेय साहित्यांचे वाटप




**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदार संघाचे माजी आमदार आदरणीय श्री लक्ष्मण आण्णा पवार यांचे मोठे बंधू भाग्यविधाते आदरणीय दैवत श्री बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ताकडगाव येथे सामाजिक उपक्रम, अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ताकडगाव येथे शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले ह्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती, गेवराई तालुक्याच्या रणरागिणी आमचे दैवत आदरणीय सौ, गिता भाभी पवार ह्यांच्या हस्ते शालीय साहीत्य वाटप करण्यात आले, यावेळी प्रमुख उपस्थिती भाजपा महिला आघाडीच्या तालुका अध्यक्ष आदरणीय सौ.रत्नमाला,नानी मोटे, यावेळी उपस्थित गावातील महिला सौ,अनिता केदार, श्रीमती,सत्यशिला गिरी श्रीमती, सावित्रा मोटे, श्रीमती निलावती पालेकर, यावेळी शाळेचे विद्यार्थी शिक्षक, शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री शिवाजी सानप, श्री काशिद सर,श्री प्रदीप सराफ सर, श्री भगवान कोळी सर श्रीमंती,कल्पना,जाधव.मॅडम, श्रीमती रेणुका शेळके मॅडम, शाळेचे शिक्षक इत्यादी उपस्थित गावातील नागरिक, या कार्यक्रमाचे,आयोजन श्री शिवाजी पवार,माजी ग्रामपंचायत सदस्य श्री मनोज, केदार ,अविनाश मोटे, भाजपा दिव्यांग विकास आघाडी गेवराई तालुका अध्यक्ष श्री दत्ता गिरी , श्री कल्याण मोटे,श्री लक्ष्मीकांत पालेकर, ,श्री नामदेव मोटे केले,, होते, यावेळी उपस्थित माजी सरपंच विजय डोळस,जालींदर केदार,ग्रामपंचायत सदस्य, श्री अनंत मोटे, ग्रामपंचायत सदस्य,श्री आप्पा मोटे श्री,कैलास मोटे,, गावातील जेष्ठ नागरिक श्री आत्माराम राऊत, श्री शंकर मोटे,श्री कारभारी काकडे व ईतर ताकडगावातील,गावातील नागरिकउपस्थित होते.

## दिंद्रुड येथे कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात येणार नाही ; बंदला वैतागलेल्या व्यापाऱ्यांचा एकमुखी ठराव

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



वेगवेगळ्या कारणांमुळे पुकारण्यात येणाऱ्या सततच्या बंदला दिंद्रूडकर व व्यापारी पुरते वैतागले आहेत. यामुळे सर्व व्यापाऱ्यांनी एकत्रित येऊन बैठक घेतली. यापुढे काहीही झाले तरी कुठल्याही परिस्थितीत बंद पुकारण्यात आला तरी आपापली दुकाने चालू ठेवण्याचा एकमुखी निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.माजलगाव तालुक्यातील दिंद्रूड ही सर्वात मोठी बाजारपेठ आहे. व्यावसायिक दृष्ट्या अतिशय झपाट्याने वाढत असलेल्या मार्केटला बाहेरील व्यापारीवर्ग व्यापारासाठी पहिली पसंती देतात. भुसार, कृषी उत्पादने, बांधकाम साहित्या पासून ते सोन्याचांदीची खरेदी - विक्री मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे दररोज लाखोंची उलाढाल होते. इथला शेकडो वर्षांपासून भरणारा आठवडी बाजार पंचक्रोशीत लोकप्रिय आहे.

मागच्या काही वर्षांपासून कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत होणाऱ्या बंद मुळे व्यापारी वर्गाला अनेक अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. यालाच वैतागलेल्या दिंद्रुड येथील सर्व व्यापाऱ्यांनी येथील शिवाजीनगर भागात शनिवारी सकाळी बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत यापुढे कुठल्याही परिस्थितीत बंद पाळण्यात येणार नसल्याचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला.

## नेकनूरच्या ग्रामपंचायतला नगर पंचायतचा दर्जा द्या ; आमदार नमिता मुंदडा यांची विधानसभेत मागणी

**नेकनूर । प्रतिनिधी**



मागील काही वर्षात गावाची सातत्याने वाढत जाणारी लोकसंख्या व विस्तार पाहता कधी काळच्या गावाला आज शहराचे स्वरूप आले आहे. त्यामुळे येथे नगरपंचायतची आवश्यकता निर्माण झाली आहे त्याच अनुषंगाने नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात नेकनूर शहराचा सर्वांगीण विकासासाठी नेकनूर ग्रामपंचायला नगर पंचायातचा दर्जा द्यावा अशी मागणी केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी केली आहे नेकनूर हे गाव ५४८ ड या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले असून पाटोदा- केज व बीड चौसाळा यांच्या मध्यभागी हे गाव येत असून या गावची लोकसंख्या जवळपास ३० हाजाराच्या च्या घरात आहे. या ठिकाणी १३ हजार च्या आसपास मतदान आहे. गावचा विस्तार सुद्धा मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणावर वाढत असून जवळपास दोन ते अडीच किलोमीटर परिसरात गावचा विस्तार झाला आहे.

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील ट्रेनी शिक्षिकेची निवड नियमबाह्य ;

# योग्य उमेदवार निवडीसाठी धरणे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील च-हाटा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ट्रेनी शिक्षिकेची निवड प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने शासनाचे नियम डावलून केली आहे. संबंधित प्रकरणात गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आदेश देऊनही नियुक्ती न दिल्याने श्रीमती पिंगळे निकिता बाळु यांचे नातेवाईक आणि सहकारी यांनी काल दि.२० शुक्रवार रोजी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात धरणे आंदोलन सुरू केले होते. शिक्षणाधिकारी यांनी संबंधित आंदोलन प्रकरणी गटशिक्षणाधिकारी बीड यांना लेखी आदेश देऊनही दुपारपर्यंत कोणीही आंदोलनाची दखल घेतली नाही. आंदोलनकर्ते यांच्या विनंतीवरून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन भगवान फुलारी ,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन संपूर्ण चौकशी करून मंगळवार पर्यंत अहवाल देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियमबाह्य निवड केली असुन त्यांच्यावर कारवाई करून मला न्याय द्यावा :- पिडीत ट्रेनी शिक्षिका निकिता पिंगळे

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा च-हाटा येथे मुख्याध्यापिका परदेशी यांनी मला डावलुन नियमबाह्यपणे ईतर उमेदवाराची निवड केली.संबधित प्रकरणी गटशिक्षणाधिकारी खान यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी चौकशी करून माझी शैक्षणिक पात्रता डीएड व एमएससीआयटी कागदपत्रे पाहुन माझी नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियुक्ती केली नाही. शासनाच्या आदेशाप्रमाणे इन कॅमेरा निवड केली नाही तसेच उमेदवारांना एमएससीआयटी बंधनकारक असतानाही नियम डावलून ईतर उमेदवारांला नियुक्ती दिली. प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन मला न्याय द्यावा अशी मागणी पिडीता निकिता पिंगळे यांनी सांगितले.

न्याय न मिळाल्यास शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनास बसणार : संदिप उबाळे - गटशिक्षणाधिकारी खान यांनी निकिता पिंगळे यांची बीड.डीएड.,एमएससीआयटी हि शैक्षणिक पात्रता पाहुन नियुक्ती करण्याचे लेखी आदेश मुख्याध्यापिका परदेशी यांना दिले.

